बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष –०१ अंक –२५४ गुरूवार दि.०६ जुन २०२४ आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -254 THURSDAY DT. 06 JUNE 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

संपादक – दिपक थोरात

आपला तो बाब्या दुसऱ्याचं कारट अशी प्रवृत्ती अंगलट

काही म्हणा, खोडसाळ, हेकेखोर प्रवृत्तीच्या नेत्यांमुळे भाजपाने बीडची जागा गमवली

फडणवीसांनी भाकरी फिरवली नाही म्हणून भाकर करपली

गेवराईतला 'जादुची कांडी' बदलणारा तो 'जादुगार' कोण?

जातीय समीकरणाचा फटका बसला खरा पण स्वतःच्या चुका इतरांच्या पदरात कुठपर्यंत टाकणार?

"औबीसी, मराठा छुप्या संघर्षाला रक्तपाणी घालायचे काम कोणी केले?

आ.लक्ष्मण पवार, मा. आ. अमरसिंह पंडितांच्या गळ्यात भाजपाचा रुमाल तरी तालुक्यातुन ताईंना लीड मिळाली नाही हाय का नाही कमाल?

मुंडे साहेबांच्या उपकारातुन उतराई होण्याची संधी तालुक्यातील अनेक कार्यकर्ते, नेते, पदाधिकाऱ्यांनी गमावली?

भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना गेवराई मतदारसंघातून मताधिक्य मिळू शकले नाही गेवराई मतदारसंघांतील एकवटलेल्या मतदारांनी नेत्यांचे ऐकले नाही!

लक्ष्मण पवार अमरसिंह पंडित यांनी तुतारीला साथ म्हणजे मराठा समाजाला साथ दिल्याने पंकजा मुंडे यांना गेवराईतून मताधिक्य कमी. देवेंद्र फडवणीस अजून सुद्धा पंकजाताई मुंडे यांच्या पराभवावर बोलण्यात तयार नाहीत. बीड लोकसभा निवडणुकीत सुद्धा देवेंद्र फडणवीस यांनी भ्रशब्द का काढला नाही. आ लक्ष्मण पवार, मा. आ. अमरसिंह पंडित दोघांनीही काय दिवे लावले मुंडे बहीण भाऊ एकत्र आल्याने पोटात गोळा उठला.?

पंकजा मुंडेंना गेवराई मध्ये कमी मतदान कस पडू शकतं आ. लक्ष्मण पवार, मा.आ. अमरसिंह पंडितांनी एका लाखांची लिड द्यायला हवी होती? देवेंद्र फडवणीस पंकजा मुंडे मध्ये गेल्या काही दिवसांपासून दुरावा निर्माण झाला होता कारण की लक्ष्मण पवार हे देवेंद्र फडणवीस यांच्या जवळचे आमदार म्हणून लक्ष्मण पवार यांची ओळख निर्माण झाली आहे तर देवेंद्र फडवणीस पंकजाताई मुंडे यांचा पक्षातील अंतर्गत वाद हा अख्ख्या महाराष्ट्राला माहित आहे. तर गेवराईतील आ. लक्ष्मण पवार देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील आमदार आहेत देवेंद्र फडणवीस हे बीडचे पालकमंत्री पद आमदार लक्ष्मण पवार यांना देण्यात इच्छुक होते. पण पंकजा मुंडे यांनी त्यांना मंत्री होऊन दिले नाही. म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या विश्वासातील आमदार म्हणून लक्ष्मण पवार यांची ओळख निर्माण झालेली आहे तर पालकमंत्री पदासह आपलं मंत्री पद पंकजा मुंडे मुळे गेले आहेत. अशी भावना आमदार लक्ष्मण पवार यांच्या गेवराई तालुक्यात तील मतदारसंघांमध्ये त्यांच्या लक्ष्मण पवार च्या जवळच्या निकटवर्तीयांकडून ऐकायला मिळत आहेत. तर काही दिवसांपूर्वी पंकजा मुंडे यांचा चकलांबा उमापूर या ठिकाणी कार्यक्रम झाले. त्या उमापूर सरकारमध्ये लक्ष्मण पवार यांनी पंकजा मुंडे पासून दूर जात त्यांचे पुतणे शिवराज पवार यांना त्या सभेसाठी पाठवलं परंतु लक्ष्मण पवार हे त्या कार्यक्रमाला का गेले नाहीत. तर त्या कार्यक्रमाच्या माध्यमातून पंकजाताई मुंडे यांना लक्ष्मण पवारांनी विरोध केल्याचे चित्र स्पष्ट झाले होते. परंतु त्यानंतर लक्ष्मण पवार यांनी पंकजाताई मुंडे यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी व इतर ठिकाणच्या काही भेटी गाठी संदर्भात पंकजा मुंडे यांच्या सोबत लक्ष्मण पवार दिसले खरे परंतु लक्ष्मण पवार यांनी मात्र यावेळी दलित असतील किंवा मुस्लिम मतदार असतील व त्यांच्या भावना जाणून घेण्याचा प्रयत्न केला नाही. तुम्हाला जे करायचं आहे ते तुम्ही करा संविधानाला धोका आहे का पक्षाला धोका आहे. हे मला माहित नाही. परंतु तुम्हाला ज्याला मतदान करायचं त्याला मतदान करा पण याच वेळी लक्ष्मण पवार यांनी जर थोडीशी ताकद लावून स्वतःला दलीत मुस्लिमांचे मत पाडून घेण्याचा प्रयत्न करून स्वतः आमदार होत असतील तर पंकजाताई मुंडे यांना स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचे विचाराला मानणारे लोकांना पंकजाताई मुंडे यांना मतदान करण्यासाठी आपल्या कार्यकर्त्यांना भाग पाडणे गरजेचे होते परंतु लक्ष्मण पवार यांनी आपले आमदारकी वाचण्यासाठी पंकजाताई मुंडे यांच्या विरोधामध्ये काम करून मराठा दलित मुस्लिमांची एक घटना मतदान होऊन पुन्हा तिसऱ्यांदा आमदार होण्याचे स्वप्न बघितले आहे. पंकजाताई मुंडे यांच्या रोषाला आमदार लक्ष्मण पवार यांना सामोरे जावे लागणार आहे. पंकजाताई मुंडे यांचे गेवराई तालुक्यातील तालुक्यातील पंकजाताई वरती प्रेम करणारे कार्यकर्ते हे लक्ष्मण पवार यांच्या विरोधामध्ये काम करणे किंवा पंकजाताई मुंडे ह्या लक्ष्मण पवार यांचा तिकीट कापल्याशिवाय राहणार नाहीत अशी चर्चा मतदारसंघांमध्ये होऊ लागली आहे. येणाऱ्या काळामध्ये लक्ष्मण पवाराचे



तिकीट कापले तर मतदारसंघांमध्ये तर पंकजा मुंडे समर्थक हे लक्ष्मण पवार यांना घरी बसलेल्या शिवाय राहणार नाही.

देवेंद्र फडणवीसच्या सांगण्यावरून आमदार लक्ष्मण पवारांनी पंकजा मुंडेंच्या विरोधात काम अंधारातून करत आपले तिकीट शाबुद ठेवण्याचे काम आमदार पवारांनी खेळी केली आहे का तर पंकजा मुंडे कडून आमदार लक्ष्मण पवारांचे तिकीट कापण्याचे चर्चेला उधाण येत आहे ?

आमदार लक्ष्मण पवार देवेंद्र फडणीसच्या गटात तर अजित पवार गटाचे अमरसिंह पंडित यांनी बरोबर नियोजन लावले विधानसभेसाठी पंकजा मुंडेंना मतदानाचा टक्का घटविला.

नवनाथ आडे / गेवराई

गेवराई : संपूर्ण राज्याचे लक्ष असलेल्या बीड मतदारसंघात भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांचा पराभव झालाय. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी पंकजा मुंडेंचा पराभव केलाय. बीड जिल्ह्यात ओबीसी आणि मराठा हा वाद पेटल्यामुळं त्याचा परिणाम निवडणुकीवर झाला होता, अशी चर्चा होती. त्यामुळं बीडची लढत अटीतटीची झाली होती. पहिल्या काही फेर्यांमध्ये आघाडीवर असणार्या बजरंग सोनवणे यांना नंतर पंकजा मुंडे यांनी रोखून ठेवले. पण ३२ व्या फेरीनंतर सोनवणे हे आघाडीवर राहिले. ३१ व्या फेरीनंतर पंकजा मुंडे ४०० मतांनी आघाडीवर होत्या. मात्र शेवटच्या फेरीपर्यंत ट्विस्ट पाहायला मिळाला. सकाळपासूनच अटीतटीचा सामना पाहायला मिळत होता. बीड लोकसभा मतदारसंघात मराठा विरुद्ध ओबीसी राजकारणामुळे अतिशय संवेदनशील बनला होता. प्रत्येक फेरीत आघाडी घेणारा उमेदवार बदलत होता. त्यामुळे राज्यात सर्वात अटीतटीची लढत बीड लोकसभेत पाहायला मिळाली आहे.

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत विद्यमान आमदारांचेही ऐकले नाही. त्यांच्याविरोधात जाऊन मतदान केले आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे विद्यमान आमदार व राष्ट्रवादीचे माजी आमदार अमरसिंह पंडित हे सोबत असतानाही महायुतीचा उमेदवार पंकजा मुंडे पिछाडीवर राहिल्या आहेत. गेवराई मतदारसंघातून अपेक्षेप्रमाणे लीड न मिळाल्याने पंकजा मुंडे यांचा निसटता पराभव झाला. गेवराई विधानसभा मतदारसंघात फेर मतमोजणीची मागणी पंकजा मुंडे यांनी केली होती. जातीय राजकारण चालल्याने या पारड्याचा परिणाम जाणवला नाही. गेवराईच्या भाजपचे विद्यमान आमदारांनाही आपल्या विधानसभा मतदारसंघातून पंकजा मुंडे यांना लीड देता आली नाही. त्यामुळे पंकजा मुंडे यांना पहिल्यांदा खासदार होता आले नाही. तर दुसऱ्यांदा उमेदवारी मिळालेले शरद पवार गटाचे बजरंग सोनवणे यांनी पहिल्यांदा गुलाल उधळला आहे.

प्रत्येक लोकसभेच्या निवडणुकीत गेवराई मतदारसंघात भाजपाला मिळणारे मताधिक्य या निवडणुकीत भाजपाला टिकवता आले नाही. महायुतीच्या वतीने प्रचारात येथील भाजपचे आमदार लक्ष्मण पवार (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे) अमरसिंह पंडित यांनी प्रचार यंत्रणा ताकदीने राबवूनही भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना मताधिक्य मिळाले नाही. या मतदारसंघातून राष्ट्रवादीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी ५१ हजारांचे मताधिक्य घेतले आहे. ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर न होता मराठा आंदोलनाचा परिणाम व जातीपातीवर मतदान झाल्याचे भाजपचे मताधिक्य घटल्याची घंटा समजली जात आहे.

बीड लोकसभा निवडणुकीत गेवराई मतदार संघात तीन लाख ६५ हजार मतदारांपैकी २ लाख ६५ हजार मतदार झाले होते. एकुण ७१% टक्के मतदान झाले होते. निवडणुकीत प्रचारादरम्यान भाजपचे विद्यमान आमदार लक्ष्मण पवार, शिवराज पवार, गीता पवार तसेच राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी आमदार अमरसिंह पंडित, माजी जि.प.अध्यक्ष विजयसिंह पंडित हे प्रचारात सक्रिय होते. मोजक्यात सभा, कार्यकर्ता मेळावा, बैठका घेत मजबूतपणे तयारी केली. त्यात महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी शिवसेनेचे माजी मंत्री बदामराव पंडित, जि.प.चे माजी सभापती युद्धाजित पंडित, राष्ट्रवादीच्या पूजा मोरे हे मोजकेच पुढारी राष्ट्रवादीची खिंड लढवत होते. भाजपच्या तुलनेत महाविकास आघाडीची प्रचार यंत्रणा म्हणावी तशी तगडी नव्हती. तसेच प्रचार सभा देखील जास्त झाल्या नाही.

यंदाची निवडणूक मराठा आरक्षणामुळे भाजपविरोधी लाट, जातीची समीकरण या मुद्द्यावरच लढली गेली. मतदारांनी त्यांच्या नेत्यांचेही ऐकले नाही. त्यामुळे महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना गेवराई मतदार संघात मताधिक्य मिळू शकले नाही. भाजपचे विद्यमान आमदार लक्ष्मण पवार व राष्ट्रवादीचे माजी आमदार अमरसिंह पंडित यांची ताकद प्रचारात असतानादेखील भाजपचे मताधिक्य घटले.

पंकजाताईंना पाडण्यासाठी राज्याच्या नेतृत्वाचे आदेश लक्ष्मण पवार अमरसिंह यांनी पाळले असतील का.?

आ. लक्ष्मण पवार असतील किंवा माझी आमदार अमरसिंह पंडित असतील यांच्या गल्ली ते दिल्लीपर्यंतच्या निवडणुकीमध्ये दलित मुस्लिमांचे मत यांना मिळतात परंतु स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचले असताना सुद्धा पंकजाताई मुंडे यांना याच गेवराई मतदार संघातून लक्ष्मण पवार यांनी दलित व मुस्लिमांची मतदान का दिली नाहीत असा समान उपलब्ध उपस्थित होत असतानाच यावेळी मात्र मराठा समाजाचे आंदोलनाचे जनक मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे मराठा समाज विरोधात गेला परंतु याच मतदारसंघातील ओबीसी समाजातील वेगवेगळ्या जाती दलित मुस्लिम यांना व यांच्या कार्यकर्त्यांना अमरसिंह पंडित असतील किंवा आमदार लक्ष्मण पवार असतील यांनी मात्र आदेश दिला नसल्याची चर्चा गेवराई मतदार संघात आहे लक्ष्मण पवार व अमरसिंह पंडित यांनी खेळी करत पुन्हा एकदा मराठा समाजाचा उमेदवार म्हणून तुतारीला साथ देण्याची पसंती पंडित व लक्ष्मण पवार यांनी खेळी करून पंकजाताई मुंडे यांना पाडल्याची चर्चा गेवराई मतदार संघात आहे.

सार्यांच्याच नाकावर टिच्चून लंके झाले खासदार

प्रशांत बाफना/शेवगाव ८०५५४४०३८५

पोरंसोरी कारभार, गावात कोणीच खात नाही, योगदान काय यासह अनेक उपमांनी खिल्ली उडवल्या गेलेल्या गावागावातील तरुणांच्या फळीला साथ मिळाली ती त्या-त्या परिसरातील लंके विरोधी नेत्यांबद्दलच्या नाराजीची! त्यातूनच पारनेर तालुक्यातून निलेश लंके यांना खासदारकीची कवाडे उघडी करणारे मोठे मताधिक्य मिळाले. तालुक्यातील जवळपास सर्वच नेत्यांची साथ विखे यांना मिळाली असतानाही प्रत्यक्षात त्याचे रुपांतर मतांमध्ये झालेच नाही.याशिवाय नगर शहरातून विखे यांना मिळणारे संभाव्य मताधिक्य घटले. श्रीगोंद्यातून मतांचे मोठी आघाडी घेतली. कर्जत- जामखेड आणि शेवगाव-पाथर्डीत विखे विरोधकांसोबतच स्वकीयांची मोट बांधण्यात यशस्वी झालेल्या निलेश लंके यांनी आपणच खर्या अर्थाने जायंट किलर असल्याचे दाखवून दिले. प्रामाणिक कार्यकर्त्यांची फळी सोबत असेल तर त्या-त्या तालुक्यातील कितीही मोठी नेतेमंडळी विरोधात गेली तरी विजयश्री कसा खेचून आणायचा याचा वास्तूपाठ नीलेश लंके या सामान्य कुटुंबातील कार्यकर्त्याने संपूर्ण राज्याला घालून दिला. आमदारकीला लाथ मारताना अश्रू अनावर झालेल्या नीलेश लंके यांना खासदारकी पदरात पडल्यानंतर आनंदाश्रू येणे स्वाभाविकच होते.

राणीताई फिक्स आमदार!

गत विधानसभा निवडणुकीत साठ हजारांनी नीलेश लंके जिंकले होते. यावेळी लोकसभेत विजय मिळवताना त्यांना पारनेर तालुक्यातून चाळीस हजारांपेक्षा जास्तीचे मताधिक्य मिळाले. हे मताधिक्य निर्णायक आहे. मागील विधानसभा आणि आताची लोकसभा या दोन्ही निवडणुकांमध्ये त्यांच्या विरोधात पारनेरमधील सारेच पुढारी उभे ठाकले होते. नगर तालुक्यातील दोन जिल्हा परिषद गटात त्यांना या दोन्ही निवडणुकीत भरभरुन साथ मिळाली. आता चार महिन्यांवर विधानसभा निवडणूक आली आहे. या निवडणुकीसाठी त्यांच्या सौभाग्यवती राणीताई लंके यांची उमेदवारी अंतिम मानली जात आहे. राणीताई लंके यांच्या विरोधातील चेहरा अद्याप समोर आला नसला तरी जी नावे सध्या चर्चेत आहेत, त्यातील कोणीही समोर आला तरी त्या उमेदवारीच्या स्पर्धेतील अन्य पुढारीच त्याचा काटा काढणार हे नक्की! म्हणजेच राणीताई लंके यांना सध्याच्या विरोधी इच्छुकांमधील सारेच मदत करतील! याशिवाय नीलेश लंके यांच्या समर्थकांना आता यशाची संपूर्ण खात्री आली आहे. लोकसभेतील विजयाने नीलेश लंके यांच्यासोबत अनेक गावातील बांधावरील मतदार आणि पदाधिकारी गेल्यास आश्चर्य वाटू नये. विरोधक एकमेकांची जिरवण्यात येणार्या निवडणुकीतही दंगच राहणार आहेत. त्यामुळेच राणीताई लंके या निलेश लंके यांना मिळालेल्या साठ हजारांपेक्षा जास्त मतांनी विधानसभेत निवडून येणार यात शंका राहिलेली नाही.

लोणीत जाऊन फटाके फोडणार्या बबलू रोहोकले यांचे कौतुक!

नीलेश लंके यांच्यासोबत जिवाला जीव देणारी कार्यकर्त्यांची फौज असल्याचे या निवडणुकीत देखील स्पष्टपणे समोर आले. यातील अनेकजण स्वत:चे व्यवसाय आणि नोकर्या बाजूला ठेवून प्रचारात सक्रिय राहिले. अनेकांनी स्वत:च्या खिशात हात घातला. दुसरीकडे विखे यांच्या यंत्रणेकडे डोळे लावून बसलेले त्यांचे समर्थकही दिसून आले. कमसे कम दोन लाख मतांनी खासदार होणार असा दावा लंके समर्थक करत होते. प्रत्यक्षात तसे घडले नसले तरी विजय हा विजयच असतो. लंके यांना विजयी घोषीत केले जाताच त्यांचे भाळवणी येथील समर्थक बबलू रोहोकले व निवडक सहकार्यांनी थेट विखे पाटील यांचे लोणी हे गाव गाठले आणि त्या गावात जाऊन त्यांच्याच चौकात फटाक्यांची आतषबाजी केली. बबलू रोहोकले यांच्या या धाडसाचे संपूर्ण मतदारसंघात कौतुक होत आहे.

पाडापाडीत फडणवीसांनी भाजपाचाच गेम वाजवला!

सुजय विखे यांच्या विरोधात म्हणजेच एकूणच विखे परिवाराच्या विरोधात देवेंद्र फडणवीस हे असल्याच्या चर्चा शेवटपर्यंत कायम राहिल्या. सुजय विखे यांच्यासमोर पर्याय म्हणून राम शिंदे यांचे नाव आणणे आणि राम शिंदे यांनी थेटपणे विखे यांच्यावर हल्लाबोल करणे यापाठीमागे देखील देवेंद्र फडणवीस हेच असल्याची चर्चा झडली होती. विखे परिवार थेटपणे नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्याशी जोडला गेल्याने देवेंद्र फडणवीस यांची या परिवारावर खप्पा मर्जी झाल्याच्या चर्चाही झडल्या! राम शिंदे हे सुजय विखे यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतरही शांत बसले नाहीत. राम शिंदे यांना सक्रिय करण्यासाठी थेट मुंबईत पुन्हा बैठक घ्यावी लागली यातच सारे काही आले. फडणवीसांची ज्यांच्या-ज्यांच्यावर खप्पा मर्जी झाली त्यांचा पराभव झाल्याचे यापूर्वीही आणि आताच्या लोकसभेतील निवडणुकीत राज्यातही दिसून आले आहे. मात्र, या पाडापाडीत राज्यातील भाजपाच्या जागा कमी झाल्या! याशिवाय मराठवाड्यात भाजपाचा सुपडासाफ झाला तर विदर्भात अवघ्या दोन जागा मिळाल्या. एकूणच डोईजड होऊ पाहणार्यांचा गेम वाजवता वाजवता फडणवीसांनी भाजपाचाच गेम वाजवल्याची चर्चा झडू लागली आहे.

टिवल्या- बावल्या करण्यात पटाईत काशिनाथ दाते ठरले कळीचा मुद्दा!

कोणत्याही राजकीय पक्षाचा आमदार किंवा खासदार असला तरी त्याच्या बगलेत घुसायचे आणि ठेकेदारीतून स्वार्थ साधण्याची जुनी परंपरा काशिनाथ दाते यांनी कायम ठेवली. नंदकुमार झावरे, वसंतराव झावरे आणि विजय औटी या तीनही आमदारांच्या सोबत राहून दाते यांनी ठेकेदारी केली. विजय औटी यांनी काशिनाथ दाते यांना राजकीय ताकद दिली. त्यातून त्यांना आमदारकीची स्वप्ने पडू लागली. आपण दुसर्यांना आमदार करू शकतो तर आपणच आमदार का होऊ शकत नाही, असे त्यांना मनोमन वाटू लागले. मात्र, दुसरीकडे त्यांच्या विरोधात त्यांच्या गावापासून ते संपूर्ण तालुक्यात मोठी नाराजी उभी राहत गेली. या निवडणुकीत सर्वात आधी काशिनाथ दाते हे विखेंच्या प्रचारात सक्रिय झाले. मात्र, त्यानंतर सुजित झावरे, विजय औटी, रामदास भोसले, विजू औटी अशी नेतेमंडळी विखेंच्या तंबूत दाखल होताच काशिनाथ दाते यांनी घर गाठले. आपण सांगू तसे, अशी भूमिका घ्यायला त्यांनी विखेंना टाकळीसह अन्य गटांमध्ये भाग पाडले. मात्र, विजय औटी, सुजित झावरे सक्रिय होताच आपल्या भावी आमदारकीला प्रतिस्पर्धी आल्याचे पाहून घरात बसून घेणे त्यांनी पसंत केले. सक्रिय असल्याचे दाखविण्यासाठी त्यांनी राहुल शिंदे आणि राहुल विखे या जोडीला आईस्क्रीम खाऊ घातल्या आणि तिकडे टाकळी गटात डॉ. खिलारी यांनाही! टाकळी गटात विखे यांना मोठे मताधिक्य मिळेल असा अंदाज बांधला जात असताना प्रत्यक्षात त्या गटात वासुंदे (सुजित झावरे यांचे गाव) वगळता सर्वच गावांमध्ये नीलेश लंके यांना मोठे मताधिक्य मिळाले. टाकळी गट म्हणजे मी आणि मी म्हणजे टाकळी गट अशी आपलची जहागीरी असल्याचे दाते दाखवत राहिले. मात्र, प्रत्यक्षात या गटातील जनतेने दाते यांनाच अस्मान दाखवले. गावागावात भांडणे लावायची आणि दोन गट निर्माण करत त्यांच्यात वाद निर्माण करण्याची जुनी खेळी यावेळी देखील काशिनाथ दाते यांनी खेळली. त्यात त्यांनी त्यांचा स्वार्थ साधला असला तरी त्याचे परिणाम सुजय विखे यांना भोगावे लागले हे वास्तव समोर आले आहे. एका तरुणाच्या खुनाच्या प्रकरणात मुलाचे नाव आल्यानंतर आपल्या मुलाला त्यांनी त्यातून वाचवले. मात्र, त्याच मुलासोबत ज्या अन्य तरुणांची नावे पोलिसात गेली, त्या तरुणांना दोन महिने पोलिस ठाण्यात डांबून ठेवले असताना त्यांची- त्यांच्या कुटुंबाची साधी विचारपूस करण्याचे काम देखील दाते यांनी केले नाही. त्यामुळेच त्यांना या परिसरातील काही गावांमध्ये नो एंट्रीच्या रोषाला सामोरे जावे लागले आणि त्यातूनच त्यांच्या स्वत:च्या गावात देखील विखे यांना अत्यंत कमी मते मिळाली. येणार्या काही काळात हेच काशिनाथ दाते हे निलेश लंके यांच्यासोबत दिसल्यास आश्चर्य वाटू नये. दाते यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना जपले आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी लंके यांना मदत केल्याचा आरोपही मतदानानंतर सोशल मिडियावर झाला. टाकळी गटात लंके यांच्यासोबत मोठा नेता नसतानाही मिळालेले मताधिक्य लंके समर्थकांचे मनोबल वाढविणारे ठरले आहे.

पारनेरची आमदारकी कोणाला यातच समर्थकांनी केला विखेंचा घात!

सुजय विखे यांच्यासोबत राहिलो आणि ते विजयी झाल्यास मीच पारनेरचा आमदार अशा थाटात सुरुवातीला काशिनाथ दाते तालुक्यात फिरत राहिले. काही दिवसात सुजित झावरे सक्रिय झाले आणि त्यांनाही तसेच वाटू लागले. मात्र, यानंतर काशिनाथ दाते यांनी त्यांच्या गाडीला मागचा गिअर टाकला. टाकळी गटाचा मीच मालक अशा थोटात दोघांकडून दावे सुरू झाले. त्यातूनच टाकळीतील मताधिक्य मिळाल्यास त्याचे क्रेडीट कोणाला असाही प्रश्न समोर आला. त्याला आमदार व्हायचे आहे ना, मग मी कशाला पाहू! त्याची किंमत आणि जागा समजेल विखेंना, अशी दर्पोक्तीची भाषा सुरू झाली. या दोघांमधील वादात दोघांनीही टाकळी गट सोडून दिला. या दोघांमधील आमदारकीच्या स्वप्नात तिसरी उडी आली ती माजी नगराध्यक्ष विजय औटी यांची! त्यांच्या समर्थकांकडून भावी आमदार म्हणून अनेक सभांमधून घोषणाबाजी झाली. कायम बेरकी राजकारणात पटाईत असणार्या काशिनाथ दाते यांनी येथेही बेरकीपणा केलाच! विजू औटी यांच्यासोबत असणार्या अनेक तरुणांना फोनवर त्यांनी सबुरीने घ्या, असा सल्ला दिला! हा सबुरीचा सल्ला म्हणजे काय होता ते आता निकालानंतरच्या आकडेवारीतून समोर आले आहे. यानंतर शेवटच्या टप्प्यात माजी आमदार विजय औटी यांनी विखे यांना पाठींबा दिला. यानंतर गणित जास्तच बिघडले. विजय औटी यांच्या पहिल्या मेळाव्याला हजर राहिलेल्या अनेकांना काशिनाथ दाते यांनी अक्षरश: घोडे लावले! दुटप्पी भूमिका कशाला घेता, एकतर विजय औटी यांच्यासोबत राहा नाहीतर माझ्यासोबत राहा, अशी भाषाच त्यांनी वापरली. त्यातून अनेक कार्यकर्ते बिथरले! अनेकांनी दोघेही नको म्हणून लागलीच नीलेश लंके यांची साथ धरली. विजय औटी हे शांत असल्याने काहीजणांनी काशिनाथ दाते यांच्यासोबत बैठका केल्या. यानंतर हे सारे आपलेच कार्यकर्ते असल्याच्या भ्रमात दाते राहिले. औटी सक्रिय होताच त्या कार्यकर्त्यांना काशिनाथ दाते यांनी समजून घेण्याऐवजी घोडे लावण्याची गरजच नव्हती. मात्र, खोड जात नसते त्यानुसार काशिनाथ दाते यांनी 'बोट' घातली आणि त्याचा परिणाम विखे यांना भोगावा लागला. या चौघांच्या आधी आमदारकीची स्वप्ने पाहिली ती विश्वनाथ कोरडे यांनी! विधानसभा प्रमुख म्हणून पक्षाकडून घोषणा होताच कोरडे यांनाही आमदार झाल्यासारखे वाटू लागले. काशिनाथ दाते, सुजित झावरे, विजय औटी, विजू औटी आणि विश्वनाथ कोरडे या पाचजणांमध्ये भावी आमदारकीची स्पर्धा लागली असतानाच राहुल शिंदे यांनी सहावा नंबर लावला. आमदारकीबद्दल जाहीरपणे ते बोलले नाही. मात्र, संपूर्ण निवडणुकीत त्यांची बॉडीलाईन तीच राहिली. यासार्यांची कमी म्हणून की काय अजित पवार गटाचे प्रशांत गायकवाड यांची भूमिकाही यापेक्षा वेगळी दिसली नाही. लंके यांच्या विरोधात आमदारकीचा उमेदवार कोण या प्रश्नात सात- आठ जणांची नावे समोर आली आणि या सार्यांनी एकमेकांची जिरवण्यासाठी मतांचा टक्का वाढविण्याची जबाबदारी टाळली. 'त्याला आमदार व्हायचंय, तो पाहील', ही काशिनाथ दाते यांनी वाजवण्यास सुरू केलेली कॅसेट जवळपास सार्यांनीच वाजवली. या सार्यांच्या स्वत:च्या गावात विखे यांना मिळालेली मते यासाठी बोलकी आहेत.

राहुल शिंदे- राहुल विखे यांचा पोरकटपणा नडला!

लोकसभा निवडणूक तोंडावर आली असताना भाजपाच्या तालुकाध्यक्षपदी विखे यांनी त्यांच्या मर्जीतील राहुल शिंदे यांची निवड केली. त्यातून भाजपाचे निष्ठावान राहिलेले विश्वनाथ कोरडे, वसंत चेडे, सुनील थोरात ही मंडळी नाराज झाली. मात्र, ही नाराजी बाजूला ठेवून या सर्वांनी पक्षासाठी काम करण्याची भूमिका घेतली. त्याच्या उलट ज्यांच्यावर जबाबदारी सोपवली असे राहुल शिंदे हे शेवटपर्यंत वेगळ्या हवेत राहिले. सुपा एमआयडीसीतील ठेकेदारीचा आरोप नीलेश लंके यांच्यावर होत असताना दुसरीकडे हेच राहुल शिंदे देखील ठेकेदारी करत राहिले. याशिवाय दर बुधवारी मंत्रालयात हजेरी लावणार्या याच राहुल शिंदे यांनी जनतेची कामे किती आणि बदल्यांची कामे किती केली याचीही चर्चा झालीच! स्वीय सहाय्यकांच्या इशार्यावर कामकाज चालविण्याचा विखे यांच्यावर संपूर्ण मतदारसंघात आरोप झाला. तोच आरोप पारनेरमध्येही कायम राहिला. राहुल विखे यांच्याकडून कोणत्याच कार्यकर्त्यांचे काम झाले नाही. कार्यकर्त्यांचे फोन घ्यायचे नाही, घेतलाच फोन तर त्यांच्याशी उद्धटपणे बोलायचे! राहुल शिंदे, काशिनाथ दाते यांच्या इशार्यावर खासदार- पालकमंत्र्यांना चुकीची माहिती देण्याचे काम याच राहुल विखे यांच्याकडून झाल्याची भावना बहुतांश भाजपा आणि विखे समर्थकांमध्ये वाढीस लागली आणि त्याचा परिणामही मतदानावर झाला.

पारनेरमधील सार्याच विरोधी पुढार्यांच्या गावात लंके आघाडीवर!

नीलेश लंके यांच्या विरोधात झाडून सारे पुढारी विखे यांच्या सोबत गेले. खरेतर हा प्रयोग मागील विधानसभा निवडणुकीत विजय औटी यांच्याबाबत झाला होता. औटी यांच्यासोबत सारे पुढारी गेले. अपवाद होता नंदकुमार झावरे यांचा! सारे पुढारी सोबत असताना निकाल औटी यांच्याबाजूने लागेल असे वाटत असताना प्रत्यक्षात नीलेश लंके हे साठ हजारांपेक्षा जास्त मतांनी विजयी झाले. या निवडणुकीत सुजय विखे यांच्यासोबत माजी आमदार विजय औटी, रामदास भोसले, काशिनाथ दाते, विश्वनाथ कोरडे, वसंत चेडे, बंडू रोहोकले, सचिन वराळ, दत्ता पवार, सुरेश पठारे, बाबासाहेब खिलारी, सुनील थोरात अशी दिग्गज म्हणवून घेणारी मंडळी होती. मात्र, या सार्यांच्याच स्वत:च्या गावात नीलेश लंके यांना मोठे मताधिक्य मिळाले. या नेत्यांनी स्वत:चे गाव जरी सांभाळले असते तरी लंके यांचे मताधिक्य कमी झाले असते. याच्या उलट नीलेश लंके यांच्या फाटक्या समजल्या जाणार्या समर्थकांनी स्वत:चे गाव सांभाळताना विखे यांच्यासोबत पुढारपणात मग्न राहिलेल्या या पुढार्यांच्या गावावर लक्ष केंद्रीत केले. गणिमीकाव्याने लंके प्रतिष्ठान लढले आणि त्यांनी विजयश्री मिळवण्यासाठी आवश्यक असणारी मते खेचून आणली.

नीलेश लंके प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी बाजी लावली आणि दिल्ली सर केली!

लंके प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांबद्दल विखे समर्थकांकडून अनेकदा खिल्ली उडवली जात होती. मात्र, प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी जीवाची बाजी लावली. यात प्रामुख्याने अर्जुन भालेकर, बाबासाहेब तरटे, ॲड. राहुल झावरे, पोटघन मेजर, बबलु रोहकले, दादा शिंदे, बाळासाहेब खिलारी आदींनी मोलाची भूमिका बजावली. रात्रीची यंत्रणा म्हणून प्रतिष्ठानचा आणि स्वत: लंके यांचा नामोल्लेख करत खिल्ली उडवली गेली. मात्र, यंत्रणा म्हणजे काय हे या सर्वांनी कृतीतून दाखवून दिले. आतापर्यंत जिल्ह्यातील जनतेला विखेंची यंत्रणा माहिती होती आणि तिचा अनुभव होता. आता यानिमित्ताने लंके यांची यंत्रणा कशी काम करते आणि निकाल कसा लावते हे त्यांनी दाखवून दिले व दिल्ली सर करून दाखवली.

एकनाथ शिंदे यांचा आदेश दिलीप सातपुते यांच्याकडून फाट्यावर!

महायुतीचा धर्म पाळा असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या सर्वच पदाधिकारी आणि शिवसैनिकांना ठणकावून सांगितले होते. मात्र, नगर शहरात तसे घडले नाही. शिंदे समर्थक असणारे सेनेचे शहर प्रमुख दिलीप सातपुते यांनी त्यांच्या मुलाच्या लग्नापासूनच नीलेश लंके यांना साथ देण्याचा निर्णय घेतल्याचे समोर आले होते. मतदानाच्या दिवसापर्यंत दिलीप सातपुते हे सुजय विखे यांच्या प्रचारात फक्त शरीराने दिसत होते. त्यांचे केडगावमधील सर्व समर्थक लंके यांच्या प्रचारात आघाडीवर होते. दिलीप सातपुते हे एकटेच आणि तेही शरीराने विखे यांच्या व्यासपीठावर दिसत होते. आपण सक्रिय आहोत हे दाखविण्यासाठी ते दिवसभरातून किमान दोनदा भाजपाचे शहराध्यक्ष अभय आगरकर यांना भेटायचे! मात्र, प्रत्यक्षात हे सारे वरकरणी होते. एकनाथ शिंदे यांचा आदेश असतानाही सातपुते यांनी तो आदेश फाट्यावर मारला. नगर शहरातील आ. संग्राम जगताप, संदीप कोतकर आणि शिवाजी कर्डिले यांच्या विरोधात त्यांनी कायम भूमिका ठेवली. या निवडणुकीत तीघेही उमेदवार नव्हते. उमेदवार होते सुजय विखे! मात्र, हे तीघेही विखे यांच्यासोबत असल्याने त्यांच्या रागातून दिलीप सातपुते व समर्थकांनी विखे यांच्या विरोधात भूमिका घेतली आणि त्याचा व्हायचा तो परिणाम विखे यांना भोगावा लागला. अर्थात, एकनाथ शिंदे यांनाही आता भूमिका घ्यावी लागणार आहे.

ठाकरे शिंदे शिवसेनेचे राज्यात भांडण, नगरमध्ये निलेश लंके यांच्यासाठी गळ्यातगळे!

शिवसेना फोडल्यानंतर राज्यात दोन गट निर्माण झाले. त्यातून उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे या दोघांची शिवसेना समोर आली. राज्यात एकमेकांशी विळ्याभोपळ्याचे सख्य असताना नगरमध्ये मात्र उलटेच घडले. ठाकरे आणि शिंदे या दोघांच्याही पदाधिकारी आणि शिवसैनिक यांना सोबत घेण्याचे काम नीलेश लंके यांनी केले. वास्तविक निलेश लंके हेच पूर्वाश्रमीचे शिवसैनिक आणि तालुकाप्रमुख राहिलेले आहेत. त्यामुळेच त्यांचे या सर्वांशी जवळचे संबंध होतेच. शिंदे यांच्या गटात गेलेले पारनेरचे तालुकाप्रमुख विकास रोहोकले यांचा अपवाद त्यात राहिला. जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, शहरप्रमुख दिलीप सातपुते, नगरसेवक सचिन जाधव यांनी दिवसाएक आणि रात्री एक अशी भूमिका घेतली. नीलेश लंके व समर्थकांनी या सार्यांना अत्यंत पद्धतशिरपणे हाताळले आणि त्याचे रुपांतर मतदानात झाले.

चंद्रशेखर घुले समर्थकांकडून जिल्हा बँकेचा वचपा

जिल्हा बँक चेअरमन निवडणुकीचा विषय अंतर्गत होता. माजी आमदार शिवाजी कर्डिले यांनी सभागृहात बसल्या- बसल्या खेळी खेळली आणि चंद्रशेखर घुले यांच्या विरोधात अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला आणि कर्डिले हे बँकेचे अध्यक्ष झाले. कर्डिले अध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतर विखे यांनी कर्डिले यांचा सत्कार केला आणि त्यानंतर सातत्याने विखे यांनी कर्डिले यांचं समर्थन केले. कर्डिले यांनी अध्यक्ष झाल्यानंतर राहुरी कारखान्यासह भेंडा कारखान्याबाबत वेगळी भूमिका घेतली. बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत सहजशक्य असताना चंदशेखर घुले अध्यक्ष म्हणून निवडून आले असते. मात्र, अंतर्गत कुरघोड्यांमध्ये कर्डिले यांनी बाजी मारली. त्यामुळे घुले नाराज झाले. त्यांची नाराजी शेवटपर्यंत कायम राहिली. या निवडणुकीत घुले हे विखे यांच्यासोबत वरकरणी दिसले. त्यांच्याकडून विखे यांच्यासाठी खास प्रयत्न झाले नाहीत! समर्थकांना त्यांनी किती फ्री हँड दिला होता हे निकाल जाहीर होताच शेवगावमधील अनेक घुले समर्थकांच्या व्हाटसअप स्टेटसवरुन समोर आले आहे. जिल्हा बँकेतील हा वचपा काढल्याचे त्यांचे समर्थक बोलत असून यातच सारे काही आले.

शहर भाजपातील अनेकांनी पाठ फिरवली!

भाजपाच्या नगर शहरातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रचारात विखे यांना साथ देत असल्याचे दाखवले. मात्र, शेवटच्या आठवड्यात बहुतेकांनी पाय गाळले. नगर शहराची प्रचार आणि नियोजन यंत्रणा आ. संग्राम जगताप यांच्या ताब्यात दिल्याने ते नाराज झाल्याचे आता सांगितले जात आहे. जगताप यांना भाजपाच्या स्थानिक बहुतेकांचा विरोध असल्याने त्याचे परिणाम विखे यांना भोगावे लागले. नगर शहरातून तीस हजारांपेक्षा जास्त मतांचे लीड मिळाले असले तरी भाजपाचा हा गट अधिक सक्रिय झाला असता तर हा आकडा वाढला असता!

अजित पवार गटाच्या चंद्रशेखर घुले, राजेंद्र नागवडे, प्रशांत गायकवाड, बाळासाहेब नाहाटा आदींकडून तुतारीच!

राज्यात महायुतीचे सरकार असल्याने सुजय विखे यांना अजित पवार गटाची जिल्ह्यात साथ मिळेल असे वाटत होते. मात्र, प्रत्यक्षात नगर शहरातील आ. संग्राम जगताप यांचा अपवाद वगळता अन्यत्र बहुतांशजणांनी तुतारीला ताकद देण्याचे काम केले. विशेषत: शेवगावमध्ये माजी आमदार चंद्रशेखर घुले यांच्या समर्थकांनी जाहीरपणे विखे यांच्या विरोधात भूमिका घेतल्याचे आकडेवारी सांगते. राजेंद्र नागवडे हे श्रीगोंद्यातील मोठं प्रस्थ! मात्र, त्यांच्या वांगदरी गावासह कारखाना कार्यक्षेत्रातील बहुतांश गावात नीलेश लंके यांचाच बोलबाला राहिला. अजित पवार समर्थक माजी जिल्हाध्यक्ष प्रशांत गायकवाड हे संपूर्ण निवडणुकीत बारामतीच्या प्रचाराची धुरा त्यांच्याच खांद्यावर असल्याचे दाखवत राहिले. त्यांच्याच गावात देखील नीलेश लंके यांना मोठे मताधिक्य मिळाले. अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नाहाटा यांनी निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात हजेरी लावली. मात्र, पारनेर आणि कर्जतमधील अजित पवार यांची सभा संपल्यानंतर स्वीच ऑफ होणेच पसंत केले. त्यांच्या लोणीव्यंकनाथ गावासह परिसरात लंके यांनी मारलेली बाजी आणि नाहाटा यांनी रात्रीच्या अंधारात केलेली कामगीरी विखे यांना दगाफटका देणारी ठरली.

विखे यांनी राजीनामा द्यावा: तरटे

पालकमंत्री असणार्या राधाकृष्ण विखे पाटील यांच्या स्वत:च्या मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांना मताधिक्य मिळाले आहे. याशिवाय नगर मतदारसंघात महसूल आणि पोलिस अशा सार्या प्रशासकीय यंत्रणा दावणीला बांधल्यागत राबवून घेतल्या. नीलेश लंके हे सामान्य कुटुंबातून आलेले असतानाही त्यांनी जनतेच्या जिवावर विखे यांना धडा शिकवला आहे. राज्याचे महसूलमंत्री असतानाही ते आपल्या मुलाचा पराभव टाळू शकले नसल्याने आणि लोखंडे यांच्यापेक्षा वाकचौरे यांना शिर्डीत मताधिक्य मिळाले असल्याने आता नैतिक जबाबदारी स्वीकारुन राधाकृष्ण विखे यांनी पालकमंत्री पदासह राज्याच्या मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी राष्ट्रवादीचे पारनेर तालुकाध्यक्ष बाबासाहेब तरटे यांनी केली आहे.

बाळासाहेब थोरात खर्या अर्थाने जायंट किलर!

नगरसह शिर्डी मतदारसंघात महाविकास आघाडीचा उमेदवार ठरवण्यापासून ते या दोघांना विजयी करण्यापर्यंत खर्या अर्थाने जायंट किलरची भूमिका ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केली. या दोन्ही मतदारसंघात आपण स्वत: उभे असल्यागत त्यांनी लक्ष घातले. दोन्ही मतदारसंघात संगमनेरमधील विश्वासू कार्यकर्त्यांची फौज दिली. मतदान संपेपर्यंत संगमनेरची ही यंत्रणा दोन्ही मतदारसंघातील गावागावात ठाण मांडून राहिली. बाळासाहेब थोरात यांची ही मोहीम येथेच थांबली नाही. मतमोजणीसाठी देखील त्यांनी आपली यंत्रणा पोलिंग एजंट म्हणून उभी केली. शिर्डीतून वाकचौरे यांना विजयी करण्यापेक्षाही नगरमधून सुजय विखे यांना पराभूत करण्याचा चंगच त्यांनी बांधला होता. यासाठी त्यांनी नगरमध्ये अनेकदा तळ ठोकला. लंके यांच्यावर नाराज असणार्यांच्या त्यांनी प्रत्यक्ष गाठीभेठीही घेतल्या. नाराजी दूर करत नीलेश लंके यांना साथ देण्याचे आवाहनही त्यांनी अनेकांना केले. दोन्ही मतदारसंघात बाळासाहेब थोरात यांनी करो या मरोचा नारा दिला आणि दोन्ही जागांवर महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी करण्यात मोलाचे योगदान दिले.

आता 'काळजीवाहू' सरकार

प्रशांत बाफना/शेवगाव
८०५५४४०३८५

केंद्रात सत्तेची हॅट्ट्रिक साधण्यासाठी लोकसभा-२०२४ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने 'चार सौ पार'चा नारा दिला होता. मात्र, मतदारांनी फासे उलटे टाकत भाजपला बहुमत सिद्ध करता येणार नाही एवढ्या कमी आकड्यापर्यंत आणून ठेवले आहे. केंद्रात भाजप दहा वर्षांपासून स्वबळावर सत्ता उपभोगत आहे. मात्र, आता भाजपला केंद्रात हॅट्ट्रिक साधण्यासाठी 'एनडीए'मधील घटक पक्षांची मर्जी सांभाळावी लागणार आहे. म्हणजेच केंद्रात भाजपची मर्जी चालणार नाही, तर त्यांना एनडीएतील घटक पक्षांची काळजी वाहत त्यांची मर्जी सांभाळावी लागणार आहे. त्याची झलक नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू यांनी सत्तास्थापनेपूर्वीच दिली आहे. या दोन्ही नेत्यांनी भाजपला आपला पाठिंबा जाहीर करत आपल्या मागण्यांचे पत्रदेखील सादर केल्याचे समजते. चारशे पारचे स्वप्न पाहणाऱ्या भाजपला या निवडणुकीत २४० जागा मिळाल्या. एनडीएच्या एकत्रित जागांचा विचार केल्यास एकूण २९३ जागा प्राप्त झाल्या आहेत. 'इंडिया' आघाडीने २३२ जागांवर विजय मिळवला आहे. या आघाडीतील प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेसने ९९ जागा मिळवत पुन्हा एकदा आपले विरोधी पक्षनेतेपद प्राप्त केले आहे. ५४३ सदस्य असलेल्या लोकसभेत बहुमत प्राप्त करण्यासाठी २७२ चा आकडा पार करावा लागतो. 'एनडीए मध्ये तेलुगू देशम पार्टी, जनता दल युनायटेड, शिवसेना एकनाथ शिंदे गट व चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पार्टी या प्रमुख घटक पक्षांचा समावेश आहे. एनडीएने २९३ जागा प्राप्त करून बहुमताचा आकडा पार केला आहे. यात भाजपने २४० जागा, जेडीयू १२, टीडीपीने १६ जागांवर विजय मिळवला आहे. दुसरीकडे 'इंडिया' आघाडीने २३२ जागा प्राप्त केल्या आहेत. त्यात काँग्रेसला ९९, समाजवादी पार्टी ३७, तर तृणमूल काँग्रेसला २९ जागा मिळाल्या आहेत. एकेकाळी इंडिया आघाडीचा भाग असलेले जेडीयूचे प्रमुख नितीश कुमार व टीडीपीचे एन. चंद्राबाबू नायडू 'इंडिया' आघाडीत आले, तरी त्यांच्या २८ जागांच्या जोरावर इंडिया आघाडी बहुमताचा आकडा पार करू शकत नाही. एकंदरीत केंद्रात सत्ता स्थापण्यासाठी 'एनडीए' व 'इंडिया' आघाडीला नितीश कुमार व चंद्राबाबू नायडू यांच्याशिवाय पर्याय नाही. चंद्राबाबूंचा टीडीपी १५ जागांसह एनडीएमधील दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे आणि नितीश यांचा जेडीयू १२ जागांसह एनडीएमधील तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. भाजपसाठी यावेळी दोन्ही पक्ष आवश्यक आहेत. त्यांच्याशिवाय भाजपला सरकार स्थापन करणे अवघड आहे. या दोन व्यक्तींना भारतीय राजकारणात आता अचानक महत्त्व प्राप्त झाले आहे. तेलुगू देशम पक्ष भाजपच्या नेतृत्वातील एनडीएच्या आघाडीत सहभागी होण्यास तयार असून, त्यांनी काही अटी ठेवल्याचे समजते. या पक्षाचे नेते चंद्राबाबू नायडू यांनी काही महत्त्वाची खाती मागितली आहेत. लोकसभेच्या अध्यक्षपदासह रस्ते वाहतूक, आरोग्य, ग्रामविकास, कृषी, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, जलशक्ती आदी खात्यांसह केंद्रीय अर्थराज्यमंत्रिपदाची मागणी त्यांनी केल्याचे समजते. या मागण्या करताना नायडू यांनी दूरदर्शी धोरण आखलेले दिसते. अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात लोकसभेचे अध्यक्षपद तेलुगू देशम पक्षाचे जी.एम.सी. बालयोगी, शिवसेनेचे मनोहर जोशी या मित्र पक्षांना देण्यात आले होते. नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात भाजपला बहुमत मिळाल्यानंतर मित्र पक्षांना हे अध्यक्षपद देण्यात आले नाही. त्याशिवाय लोकसभेचे उपाध्यक्षपद रिक्त ठेवले होते. पक्षांतर बंदीच्या प्रकरणात लोकसभा अध्यक्षांची भूमिका कळीची ठरत असल्याने लोकसभा अध्यक्षपदावर आता तेलुगू देशमने दावा केल्याचे समजते. त्याचबरोबर जेडीयूने तीन, चिराग पासवानने दोन (एक कॅबिनेट, एक स्वतंत्र प्रभार), मांझीने एक, शिंदे यांनी दोन (एक कॅबिनेट, एक स्वतंत्र प्रभार) मंत्रिपदांची मागणी केली आहे. एकंदरीत भाजपची अवस्था आता 'शहर बसा नहीं की आए लुटेरे' अशी झाली आहे. एनडीएच्या घटक पक्षांकडून नरेंद्र मोदी यांची नेता म्हणून निवड करण्यात आली आहे. ८ तारखेला मोदी यांची तिसऱ्यांदा ताजपोशी करण्याच्या हालचाली भाजपकडून सुरू आहेत. महाराष्ट्रातील परिस्थिती पाहता शिवसेना उद्धव ठाकरे पुन्हा 'एनडीए'मध्ये सहभागी होतील, अशी शक्यता नाही. त्यांनी तसा प्रयत्न केला तर तो मतदारांचा अनादर ठरेल. केंद्रात तिसऱ्यांदा सत्तेत येण्यासाठी व चारशे पारचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्राप्रमाणे इतर राज्यांत भाजपने पक्ष फोडत सत्तास्थापन केली. मात्र, हीच रणनीती भाजपच्या अंगलट आली आहे. त्यांना आता वाजपेयी सरकारप्रमाणेच 'मिलिजुली सरकार' स्थापन करत घटक पक्षांची मर्जी सांभाळावी लागणार आहे. एक वर्षापूर्वी स्थापन झालेल्या २८ पक्षांच्या 'इंडिया' आघाडीने मात्र भाजपच्या दहा वर्षांच्या सत्तेला सुरुंग लावला आहे. राजकारणातला हा पहिलाच प्रयोग नाही. यापूर्वीही १९७४ मध्ये जयप्रकाश नारायण व मोरारजी देसाई यांनी एकत्र येऊन 'जनता मोर्चा'ची स्थापन करून इंदिरा गांधींच्या एकहाती वर्चस्वाला आव्हान देत सत्तांतर घडवून आणले होते. त्यावेळच्या राजकीय गरजेतूनच 'जनता प्रयोग' केला गेला आणि तो यशस्वीही झाला. त्यामुळे देशाला स्वातंत्र्यानंतर तीस वर्षांनी पहिला बिगरकाँग्रेसी पंतप्रधान मिळाला. आज मोदी सरकारविरुद्ध विरोधी पक्षांनी पुन्हा हाच प्रयोग राबवला आहे. फरक एवढाच आहे.

पुणे येथे इंदिरानगर(बर्माशेल) संघमित्र बुद्ध विहार प्रणीत रमाई महिला मंडळाच्या वतीने पत्रकार किरण जावळे,पत्रकार राजेश्वरी मोरे,कॅमेरामन मनिषा मोरे आमच्या सन्मान करण्यात आल्या.रमाई महिला मंडाळाच्या समक्षा जाणुन घेतल्या,व काही महिलाच्या संदर्भात मुलाखती घेण्यात आल्या,महिलांना सुरक्षा कमी दिसत आहे या बद्दल महिलांच्या आवाज उंचवला आहे.राज्यात संपुर्ण महाराष्ट्रास स्त्रीया पुरूषांच्या खांद्याला खांदा देवुन पुढे जात आहेत पण कुठेतरी स्त्रीया कमतरता मिळते महिलांना असुरक्षा मिळते.रमाई महिला मंडळामधुन महिला अनेक जबाबदारी सभाळत असताना हि येणात्या सरकारकडून हि अपेक्षा आहे की महागाई कमी झाली पाहीजे गोरगरीबांकडे सरकारकडून लक्ष दिले पाहिजे,महिला सुरक्षेवर भर दिला पाहिजे या सर्व रमाई महिला मंडळाचा अपेक्षा आहेत याप्रसंगी गोजर जेटीथोर अध्यक्ष,अरूणा तांगडे उपाध्यक्ष,विजया घोडेस्वार खजिनदार,रंजना भिंगारदिवे उपखजिनदार,लता घोडेस्वार उपकार्यअध्यक्ष,अलका कांबळे सेक्रेटरी,वंदना मोरे सामाजिक कार्यकत्या,बेबी जावळे,करूणा वीर,सिताबाई गजघाट,सुरेखा वंजारी,नंदा वीर,इंदु फुलमाळी,रेखा काकडे,कलावती वीर,रेखा आदमाने,मंदा काकडे,पमा घोडेराव,वच्छला वाघमारे,प्रभा सोनवणे,लीला पवार,पंचशिला सूरवसे,मिना मोरे,रमाई महिला मंडळाच्या महिला आदि उपस्थित होत्या

मला वाटतं..शंभर टक्के खरंय..

मराठी पत्रकार परिषदेचे महाराष्ट्र राज्याचे सर्वेसर्वा मा.एस.एम.देशमुख यांनी वस्तुस्थिती मांडली आहे.

नरेंद्र मोदी आणि त्यांच्यामुळे भाजपची आज जी दुर्गती झालीय त्यानं देशातील जे काही आत्मे दु:खी झाले आहेत त्यात गोदी मिडिया चे आमचे काही मित्र देखील आहेत..काल सकाळी सुरूवातीला निकालाचे कल जेव्हा भाजपच्या बाजुनं येत होते,तेव्हा गोदी मिडियाच्या अँकरचे आवाज टिपेला गेलेले होते .. त्यांना आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या.. नंतर हे आवाज क्षीण होत गेले.. थोडं थांबा, येत्या काही दिवसात हे आवाजही तुम्हाला ऐकू येणार नाहीत.. कारण दहा वर्षात पत्रकारितेचा दुरूपयोग करीत, जनतेच्या प्रश्नांकडे पुर्ण दुर्लक्ष करीत गोदी मिडियानं केवळ एका व्यक्तीच्या आरत्या उतारण्यात धन्यता मानली.. त्यानिमित्तानं देशात नुसता उच्छाद मांडला होता.. त्याचा फटका देशातील तमाम पत्रकारांना बसला.. गोदी मिडियामुळे देशातील सर्वच पत्रकारांकडं लोक संशयानं पाहू लागले.. माध्यमांची विश्वासार्हता रसातळाला नेऊन ठेवण्याचं महापाप या लोकांनी केलं आहे.. अगदी निवडणुकांनंतर एळीं श्रिश्र च्या नावाखाली या लोकांनी जो गोंधळ घातला तो कुठल्याही परिस्थितीत क्षम्य नाही.. त्यातून शेअर बाजार

कोसळला.. अब्जावधीला चुना लागला.. हा देशद्रोहच आहे.. अंजना ओम कश्यम, रूबिका लियाकत, रजत शर्मा, अमन चोपडा, सुधीर चौधरी, गुल्लु, अर्णब गोस्वामी, श्वेता सिंह, सुमित अवस्थी ही सारी मंडळी याला जबाबदार आहे.. मराठीत देखील असे काही चेहरे आहेत..

प्रशांत किशोर सारख्या भंपक राजकीय विश्लेषकाला (?) डोक्यावर घेण्याचं पापही या लोकांनीच केलं..यांची सारयांची मिलीभगत होती..खरं म्हणजे प्रशांत किशोर यांचा एकही अंदाज कधी खरा ठरला नाही.. शिवाय हा माणूस ज्या ज्या पक्षाचा माध्यम सल्लागार झाला किंवा त्यांच्या कच्छपी लागला त्या त्या पक्षाची वाट लागली.. आज त्यांनी नरेंद्र मोदी यांना वाटेला लावलंय..

निवडणुकीत मोदी मॅजिक दिसेल अशी हवा या सर्वांनी तयार केली होती. त्यांची हवा देशातील जागरूक मतदारांनी काढून घेतली.. त्यामुळे नरेंद्र मोदी, अमित शहा, जे. पी. नड्डा, अदानी यांना जेवढं दु:ख झालं नसेल त्यापेक्षा जास्त दु:ख गोदी मिडियाच्या वरील सर्व पत्रकारांना झालं.. ते आज नक्कीच आपली छाती बडवून घेत असतील.. उद्या इंडिया अलायन्सचं सरकार जर आलं तर मोदी, शहांच्या राजकीय कारकीर्दीचा जसा ढहश एपव होणार आहे तव्दतच गोदी मिडियाच्या वरील मित्रांच्या पत्रकारितेतील करिअरचा देखील ढहश एपव होणार आहे.. हे लाचार चेहरे पुन्हा टीव्हीच्या पडद्यावर कधी दिसणार नाहीत. हा प्रशांत किशोरचा अंदाज नाही.. माझा अंदाज आहे..

मुसा खान ग्राऊंडवर काम करणारा पंकजाताई मुंडे यांचा शिलेदार !

बीड ।प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत अल्पसंख्याक समाजात भाजप विरोधी लहर असल्यामुळे अनेक कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या समोर जाण्यास अडचणीचा सामना करावा लागत होता. परंतु मुंडे साहेबांशी आपुलकी ठेवणारे काही शिलेदार असे दिसुन आले. ज्यांनी ठाम भुमिका घेवुन मुंडे साहेबांची लेक पंकजाताई मुंडे यांच्या विजयासाठी दिवसरात्र एकत्र केले. असाच एक शिलेदार मुसा खान यांच्या स्वरूपाने पंकजाताई यांना लाभल्याचे दिसुन आले. ज्यांनी ग्राऊंडवर काम करून अल्पसंख्यांक समाजात पंकजाताई यांची भुमिका मांडण्यात यश मिळाले आहे. याठिकाणी मुस्लीम समाज भाजप बाबत काहीही ऐकायला तयार नव्हता. त्याठिकाणी

मुसा खान यांनी पंकजाताई यांची भुमिका ठामपणे मांडुन मुस्लीम समाजाचे मत वळवण्याचे यशस्वी प्रयत्न केले. ज्यामुळे बीड जिल्ह्यात

मुस्लीम समाज पंकजाताई यांना मतदान करतांना दिसुन आला आहे. यामधे मुसा खान यांचे परिश्रम विसरले जावु शकत नाही. मुसा खान हे स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे खंदेसमर्थक होते. त्यानंतर ते नेहमी खा. प्रितमताई मुंडे व नेत्या पंकजाताई मुंडे यांच्यासाठी परिश्रम घेतांना दिसुन आले आहे. सध्याची निवडणुक अटीतटीची होती. आणि यामध्ये मुस्लीम समाज भाजपामुळे पंकजाताई मुंडे यांच्याशी दुरावल्याचे दिसुन आला होता. परंतु पंकजाताई यांची भुमिका मुस्लीम समाजाबाबत सकारात्मक आहे. जे त्यांनी आपल्या भाषणात बोलुन सुद्धा दाखविले. ही बाब बीड शहरातच नव्हे तर जिल्ह्यातील मुस्लीम बहुल्य भागात पोहोचविण्यात मुसा खान यांनी यश मिळविले. बीड जिल्ह्यात मुस्लीम समाजाचे मत पंकजाताई यांच्याकडे वळवण्यात मोठे यश मुसा खान यांना मिळाल्याने तेच खरे शिलेदार म्हणुन ओळखले जात आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त अभिवादन करताना सुनील सुरवसे, स्वप्नील गलधर,प्रा गोपाळ धांडे,ऍड महेश धांडे, शेख मेहराज,धनंजय वाघमारे,निलेश वाघ, योगराज भागवत,गणेश काशीद,सचिन आगे,लक्की रनसिंग व इतर शिवप्रेमी उपस्थित होते.

कलेक्टर एसपींची बदली करा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकरांची मागणी

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामधील राजकीय दहशत निर्माण होण्यास जातीयवादी अधिकायांचा मोठा हात आहे. जनतेची कामे कमी आणि लोकप्रतिनिधींचे घरगडी झाल्यासारखे अधिकारी बागले. या निवडणुकीत तर पावलापावलावर सामान्य माणसांना ते निदर्शनास आले. अधिकाऱ्यांची वागणूक मनाला न परणारी होती आणि न रूचणारी होती. बीडच्या जिल्हाधिकारी आणि

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, बीड जिल्ह्यामध्ये

अवैध धंद्यांचा उत आला आहे. वाळू माफियांनी अक्षरशः नंगानाच सुरू केला आहे. गुन्हेगारीवर वचक राहिला नाही. वरपासून खालपर्यंतचे अधिकारी जात चधून काम करत आहेत हे अत्यंत धक्कादायक आहे. सामान्य माणसांनी न्याय मागावा की नाही, न्याय देतानाही अधिकार्याकडून जात चघितली जाते. या निवडणुकीत तर जातीचे आकर्षण आणि जातीचा पुळका न रूचणारा होता. लोकसभा निवडणुकीच्छा मतदानापासून निकालापर्यंत जिल्ह्यातील तमाम नागरिकांनी याचा अनुभव घेतला आहे. बीड जिल्हा खर्या अर्थाने शांत आणि समृद्ध ठेवायचा असेल तर जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षकांची तातडीने बदली करा अशी मागणी जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी केली आहे.जिल्हा पोलीस अधिक्षकांची बदली करा अशी मागणी जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी केली आहे.

भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाधिकाऱ्यांना मनुस्मृति श्लोक शालेय पाठ्यपुस्तकात शिकवू नये या मागणीचे निवेदन

बीड ।प्रतिनिधी

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे, यांनी तयार केलेला राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ मसुद्यावर प्रतिक्रिया नोंदविण्याबाबत केलेल्या आवाहनानुसार खालीलप्रमाणे हरकत या पत्राद्वारे नोंदविण्यात येत आहेत. इयत्ता तिसरी ते इयत्ता बारावीच्या अभ्यासक्रमामध्ये भगवद्गीता, मनाचे श्लोक आणि मनुस्मृति यांच्या विषमतावादी विचारांचा, धोरणांचा समावेश करणे या बाबी भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकार कलम १३,१४,१७,१९, २१, २८ नुसार बेकायदेशीर व असंविधानिक असल्यामुळे त्या विरोधात तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत असून व हरकती नोंदविण्यात येत आहे. आपल्या राज्य अभ्यासक्रम आराखडयानुसार शालेय अभ्यासक्रमामध्ये मनाचे श्लोक, भगवद्गीता आणि मनुस्मृतीच्या काही अंशाचा समावेश करणे आक्षेपार्ह असून, धर्मनिरपेक्ष असलेल्या भारतातील सर्व नागरिकांस समान असलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि नैसर्गिक न्यायाच्या संकल्पनेला काळीमा फासणारी बाब आहे.

तसेच सर्जनशील भारताची निर्मिती करणाऱ्या शिक्षण प्रणालीमध्ये अशा प्रकारच्या समता मुलक समाज निर्मितीच्या संविधानाच्या तत्त्वाला मूठमाती देणाऱ्या विषमता वादाचा पुरस्कार व त्याचे समर्थन करणाऱ्या अभ्यासक्रमाचा शालेय शिक्षणात समावेश करून गोर-गरीब भारतीय नागरिकांमध्ये भय आणि मानवी विषमता निर्माण होण्यास खतपाणी घालण्याचा प्रयत्न स्पष्ट होत आहे. आपल्या देशाच्या धर्मनिरपेक्ष संविधानाने देशातील सर्व जाती धर्माना संरक्षित करत, कलम २८ प्रमाणे आश्वस्त केले आहे की, कलम २८ (१) नुसार, पूर्णतः राज्याच्या निधीतून चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही अशी तरतूद आहे, त्यामुळे सरकारकडून कोणत्याही धर्माच्या विचारसरणीच्या बाबी शिकविता येणार नाहीत.त्याचबरोबर भारतीय संविधानातील कलम १३ (१) नुसार, या संविधानाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी भारताच्या राज्यक्षेत्रात अंमलात असलेले सर्व कायदे, ते जेथवर या भागाच्या तरतुदींशी विसंगत असतील तेथवर, ते अशा विसंगतीच्या व्याप्तीपुरते शून्यवत आहे, १३ (२) नुसार राज्य या भागाने प्रदान केलेले हक्क हिरावून घेणारा किंवा त्यांचा संकोच करणारा कोणताही कायदा करणार नाही आणि या खंडाचे उल्लंघन करुन केलेला कोणताही कायदा, आदेश, नियम, विनिमय, सूचना, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादी शून्यवत ठरविले आहेत. असे

असताना उपरोक्त बाबी शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे देशातील युवा वर्गाला अधोगतीच्या विषमतेच्या दिशेने पुन्हा घेऊन जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट होते आहे.वरील पार्श्वभूमीवर प्रस्तावित मसुदयामध्ये मनाचे श्लोक, भगवद्गीता आणि मनुस्मृतीच्या काही अंशाचा समावेश करणे भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकार १३,१४,१७,१९,२१,२८ नुसार बेकायदेशीर व असंविधानिक असल्यामुळे त्या बाबी रद्द कराव्यात आणि संविधानाची प्रास्ताविका, अनुछेद १३ ते ३२ पर्यंतचे मूलभूत अधिकार आणि भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्यें या मूल्यांचा समावेश

करावे की ज्यामुळे भारतीय नागरिक आपल्या हक्क आणि अधिकारासंबंधी आणि कर्तव्या संबंधी जागृत होतील. तेच देश हितकारक आहे.

वरीलप्रमाणे दुरुस्ती न झाल्यास दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया / समता सैनिक दल आणि संविधान समर्थक समाज, विविध संघटनांच्यावतीने महाराष्ट्रभरामध्ये तीव्र स्वरूपाचे पडसाद उमटतील आणि उग्र आंदोलन छेडण्यात येतील त्याची संपुर्ण जबाबदारी आपली असेल, याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी.याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ भीमराव य. आंबेडकर (ट्रस्टी / राष्ट्रीय कार्याध्यक्ष व समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष) व डॉ. हरीष रावलिया (ट्रस्टी चेअरमन), ॲड. सुभाष जौंजाळे (रिपोर्टिंग ट्रस्टी चेअरमन) यांच्या नेतृत्वाखालील शिष्ट मंडळाबरोबर चर्चा करण्यासाठी वेळ दयावी, ही विनंती यावेळी शिष्टमंडळात भारतीय बौद्ध महासभेचे बीड जिल्हा अध्यक्ष महालिंग निकाळजे,अमरसिंह ढाका, विश्वनाथ निसर्गन, शोभा साळवी, अरुणा निसर्गन,गौतम खेमाडे,केतन गायकवाड, गौतम कांबळे,संदेश डोळस,दिपक कांबळे,मिलिंद सरपते, सिद्धेश्वर बनसोडे, सदाशिव पट्टेकर आदी उपस्थित होते.

बीड मच्छिंद्र दादा काटकर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना माजीद मोमीन, इरफान मोहम्मद,अमोल मडावी, प्रशांत मोहिते, व माजीद भाऊ मित्र मंडळ.

विलंब शुल्क वाढल्याने परवाना धारकांची शनिवारी बैठक - भागवत (नाना) गायकवाड

प्रतिलिपी केंद्र शासनाने परिवहन वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी विलंब झाल्यास केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ८१ च्या तक्त्यामधील अ.क्र. ११ अनुसार ५० रुपये प्रतिदिन शुल्काची तरतूद केली आहे व सदर अधिसूचना मुंबई बस मालक संघटना यांनी रिट चाचिका क्र. ११३८०/२०१७ अन्वये मा. उच्च न्यायालय मुंबई येथे आव्हानित केली होती. याबाबत मा. न्यायालयाने दि. १०.१०.२०१७ रोजीच्या आदेशान्वये, अतिरिक्तशुल्क वसूल न करण्याबाबत स्थगिती आदेश दिले होते परंतु

दि.०२.०४.२०२४ रोजी स्थगिती रद्द करुन रु. ५०/- दंड दि. १०.१०.२०१७ पासून प्रतिदिवस लागू करण्यात आलेले आहे.

तरी याबाबत सर्व रिक्षा परवाना धारकांना व मालक चालक ॲटो रिक्षा यांना कळविण्यात येते की, दि. ०८.०६.२०२४ वार शनिवार वेळ सायं. ५.०० वाजता श्री कनकालेश्वर मंदिर परिसरात ॲटो रिक्षा पार्सिंग साठीचा ५० रुपये प्रतिदिन दंडाबाबत चर्चा करण्यात येणार आहे. तरी सर्व रिक्षा परवाना धारकांनी बहु संख्येने उपस्थित राहण्याचे अवाहन बीड जिल्हा परमिट मालक चालक ॲटो रिक्षा संघटनेचे जिल्हाध्यक्ष भागवत (नाना) गायकवाड यांनी केले आहे.

दिंद्रुड पोलीस ठाण्याचे वादग्रस्त फौजदार खोडेवाड सह पेताड पोलिसावर गुन्हे दाखल करा

मागणीसाठी पीडित महिलांचे आज पासून दिंद्रुड ठाण्यासमोर अमरण उपोषण

माजलगाव ।प्रतिनिधी

न्याय मागण्यासाठी दिंद्रुड ठाण्यात गेलेल्या महिलांच्या अंगाशी झोंबा झोंबी करून मुलांना विनाकारण अमानुष मारहाण करणाऱ्या फौजदार अण्णाराव पांडुरंग खोडेवाड सह पोलीस शिपाई साळुंखे, शेळके यांच्यावर गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी पीडित महिला सह त्यांचे कुटुंबीय आज पासून दिंद्रुड ठाण्यासमोर आमरण उपोषणास बसत आहेत. अडचणीत आलेल्या जनतेचे संरक्षण करून त्यांना न्याय देणे हे पोलिसांचे आद्य कर्तव्य असताना अनेकदा पोलीस त्यांचे कर्तव्य विसरतात. सनदशीर मार्गाने न्याय मागण्यासाठी दिंद्रुड पोलीस ठाण्यात गेलेल्या महिलांच्या अंगाशी झुंबाझुंबी करून विनयभंग केला. सर्वसाधारणपणे वर्मा शिंदे वराडी शिंदे अशी एक म्हण प्रचलित असून याचा तंतोतंत प्रत्यय दिंद्रुड ठाण्यातील कारभाराबाबत दिसून आला. लोणगाव येथे वास्तव करत असलेल्या भारत हजारे यांचे कौटुंबिक वादातून त्यांच्या भावासोबत वाद झाल्यानंतर दिनांक ११ मे रोजी ठाण्यात त्यांनी एनसी दाखल केली होती त्यानंतर २३ मे रोजी साडेअकराच्या दरम्यान दिंद्रुड ठाण्यातील पोलीस शिपाई साळुंखे व शेळके नशेच्या भिंतीत हजर यांच्या लोणगाव येथील घरी जाऊन तुम्ही आत्ताच आमच्या सोबत चला असं घागरा धरला परंतु मध्य रात्र व हे दोघेही पोलीस नशीच्या तर धुंदीत असल्यामुळे त्यांनी त्यांच्यासोबत जाण्यास स्पष्ट नकार दिला व दुसऱ्या दिवशी ठाण्यात येतोच असे म्हटले त्यानुसार भारत हजारे आपल्या पत्नी व तिन्ही मुलासोबत ठाण्यात गेले असता व्हरांड्यात खोडवाड्याने तीनही मुलांना विनाकारण अमानुष मारहाण केली नंतर कॅमेरा नसलेल्या खोलीत नेऊन पायातील बुटासह तुडविले जोरात मारहाण करत असल्याने ओरडण्याचा आवाज आल्याने आशा हजारे आत गेल्या असता फौजदार अण्णाराव पांडुरंग खोडेवड याने महिलांच्या अंगाशी झोंबाझोंबी करून विनयभंग केला. या प्रकरणी फौजदार अण्णाराव पांडुरंग खोडेवाड सह नसेबाज पोलीस शिपाई साळुंखे, शेळके यांच्यावर कठोर कारवाई करावी अशा मागणीसाठी आज पासून दिंद्रुड पोलीस ठाण्यात आमरण उपोषण करणार आहोत अशी माहिती भारत हजारे आशाबाई हजारे यांनी दिली.

हेल्मेट सक्तीच्या नावाखाली होणारी लूट थांबवा - गोरख काळे

बीड ।प्रतिनिधी

धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मांजरसुंबा परिसरात हेल्मेट सक्तीच्या नावाखाली पोलिसांकडून होणारी दुचाकी स्वरांची आर्थिक लूट त्वरित थांबवा अशी मागणी मांग गारूडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे यांनी केली. पोलीस प्रशासन कोणत्या ना कोणत्या माध्यमातून सामान्य नागरिकांची लूट करण्याचा वारंवार प्रयत्न करत आहे. वाहतूक शाखा असेल किंवा महामार्ग पोलीस असतील हे अनेक वेळा सामान्य नागरिकांच्या खिशावर दरोडा टाकण्याचे काम करीत असतात. हाच प्रकार धुळे - सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मांजरसुंबा परिसरात घडत आहे. वाहतूक पोलीस कोणत्या ना कोणत्या माध्यमातून प्रवाशांना लुटण्याचे काम करत आहे. केवळ हेल्मेट सक्तीच्या नावाखाली ग्रामीण भागातील गोरगरीब दुचाकी चोरांना दंड आकारण्यात आहेत. अनेक वेळा हा दंड कसली पावती न देता आकारला जात आहे. या माध्यमातून सर्वसामान्य ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला लुटण्याचे काम महामार्ग पोलीस करत आहे हा प्रकार पोलीस प्रशासनाने लक्ष केंद्रित करून त्वरित थांबवावा अशी मागणी मांग गारूडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे सह आदींनी केली आहे.

बीडचे नवनिर्वाचित खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांची भेट घेऊन शुभेच्छा देताना शिवसंग्राम चे शहराध्यक्ष सुहास पाटील

डॉ सचिन साबळे यांना पुरस्कार जाहीर

सिल्लोड ।प्रतिनिधी

येथील डॉ सचिन विष्णूपंत साबळे यांना न्यू दिल्ली येथील सहारा चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे BEST HEALTH CHIRO-PRACTIC PRACTI-TIONER AWARDS २०२४ जाहीर करण्यात आला आहे. डॉ सचिन साबळे हे मोक्षा स्पाईन केअर मसाज सेंटर तर्फे प्राचीन काळातील नैसर्गिक, सूजोक उपचार, कपींग हेमर थेरपी , या उपचार पद्धती ने बोंन सेटिंग, अलाइनमेंट , कायरो प्रॅक्टिस, मसाज द्वारे विना औषधी , , विना ऑपरेशन निरोगी आरोग्य या विषयावर राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये आरोग्य शिबिर, आयोजित करतात त्यांच्या या कार्याची दखल घेऊन डॉ सचिन साबळे यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

आज रोजी पुरुषोतमपूरी येथे डॉ पंजाबराव डक आले आसता बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करतांना मी डक साहेब

नगर परिषदेने पावसा अगोदर नदी व नाल्यांच्या सफाईचे काम सुरू करावे- अनिलदादा जगताप

बीड/प्रतिनिधी

मान्सून तोंडावर आला असून आता बीड नगर परिषदेने नदी व नाल्यांच्या सफाईच्या वांजोट्या बैठका बंद करून प्रत्यक्ष कामावर लक्ष केंद्रित करावे. याबरोबरच जे.से.बी., ट्रॅक्टर आदी मशनरीसह स्वतंत्र मजुराची नियुक्ती करुन नदी व नाल्यांच्या साफ-सफाईचे काम वेगाने करावे अशा सूचना शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांना दिल्या आहेत.

बिंदुसरा नदीपात्रात मोठमोठी बाभळीची झाडे उगवली आहेत. त्यामुळे नदीचे पात्र अरूंद व अस्वच्छ झाले आहे. या झाडांना पाणी अडुन पाणी शहरात घुसण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे तातडीने साफसफाई करण्याची आवश्यकता आहे. शहरातील आसपासच्या भागातील कचरा, घाण पाणी तसे रूग्णालयातील घातक कचरा उचलुन बिंदुसरा नदीपात्रात टाकला जात असल्याने नदीचे पात्र अरूंद होण्याबरोबरच नागरीकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असुन रूग्णालयातील जैविक घातक कच-यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे त्यामुळे संबंधित प्रकरणात दंडात्मक कारवाई करण्यात यावी. याबरोबरच बिंदुसरा नदीपात्रा शेजारील राहणा-या तब्बल ३०० घरांना महापुराचा धोका असुन नगरपालिकेकडुन कोणतीही उपाययोजना करण्यात येत नाही. यापुर्वीही अशा दुर्घटना घडुन वित्तहानी व जिवितहानी झालेली असुन शहरातील मोमीनपुरा, खासबाग,जुना मोंढा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,पेठ बीड भागातील लोकांची पुर आल्यानंतर तारांबळ उडते. त्यामुळे तातडीने उपाययोजना करण्यात यावी. मान्सूनचे आगमन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले आहे. मात्र

अद्याप अपेक्षित अशी कृती बीड नगर परिषदेकडून दिसत नाही. मान्सूननंतर सफाईसफाईचे काम करणे अशक्य असून नदी नाल्यांची मान्सूनपूर्व साफसफाई न झाल्यास बीडवासियांना मोठ्या अडचणींना सामोरे जाण्याची वेळ येईल. यामुळे बीड नगर परिषदेने तात्काळ आपली यंत्रणा नदी नाल्यांच्या साफसफाई साठी मार्गस्थ करावी. अशा सूचना अनिलदादा जगताप यांनी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांना दिल्या आहेत.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT